# विश्वमंगल मराठी फाऊंडेशनची कार्यपद्धती

**डिजिटल माध्यमातून जागतिक स्तरावर संपर्क व समन्वय प्रस्थापित करणे.**

- परिषद, चर्चासत्रे व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियमित आयोजन करणे.
- देश विदेशातील विविध विद्यमान महाराष्ट्र मंडळे व इतर संस्थांशी समन्वय व सहकार्य प्रस्थापित करणे.
- पारदर्शक, उत्तरदायी व सहभागात्मक कार्यप्रणालीचा अवलंब करणे.
- विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे सल्लागार मंडळ स्थापन करणे.

## झेंडा मराठीचा...
## मराठी भाषेचा...
## मराठी कर्तृत्वाचा...



**विश्वमंगल मराठी फाऊंडेशन**


Shop No. 205, Lokmangal Oxy Park, Murarji Peth, Solapur 413002

+91 74985 06390

vishwamangalmarathi@gmail.com

vishwamangalfoundation.org

Vishwamangal Marathi

vishwamangalmarathifoundation

vishwamangal_foundation

Vishwamangal Marathi Foundation


**विश्वमंगल मराठी फाऊंडेशन**

## लोकल टू ग्लोबल आणि ग्लोबल टू लोकल या संकल्पनेचे प्रणेते

लोकमंगल उद्योग समूहाचे संस्थापक
माननीय आमदार **श्री सुभाष बापू देशमुख**, सोलापूर

## विश्वमंगल मराठी फाऊंडेशनचे घोषवाक्य

**झेंडा मराठीचा... मराठी भाषेचा... मराठी कर्तृत्वाचा...**

## विश्वमंगल मराठी फाऊंडेशनचे वचन

**मराठी भाषा व मराठी भाषिक समाजाच्या उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे.**

## विश्वमंगल मराठी फाऊंडेशनचे प्रमुख ध्येय

- संत श्री ज्ञानेश्वर माऊली यांच्या जन्मवर्षाला ७५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ज्ञानेश्वरीतील अध्यात्मिक शिकवण व ' पसायदान ' द्वारे विश्वकल्याणाचा संदेश जगभर पोहोचविणे.
- मराठी भाषा, संस्कृती आणि परंपरेचा जागतिक स्तरावर प्रचार करणे.
- मराठी भाषा आणि संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्रातील मराठी शाळांचे पुनरुज्जीवन करणे व त्यांचा उत्कर्ष साधणे.
- जागतिक स्तरावर मराठी भाषिक समाजाचे संघटन करणे.
- जागतिकीकरणाच्या युगात जगभर विखुरलेल्या मराठी भाषिक समाजाला एका व्यासपीठावर आणून परस्पर संवाद, सहकार्य आणि ज्ञान विनिमयाची संधी निर्माण करणे.
- शिक्षण, उद्योग, उद्योजकता आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या मराठी व्यक्तींना / उद्योजकांना एकत्र आणून महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाला चालना देणे.



## विश्वमंगल मराठी फाऊंडेशनची संरचना

**कार्यकारी अध्यक्ष**

**माननीय आमदार**
**श्री सुभाष बापू देशमुख**

**जागतिक शिखर कार्यकारी समिती**
**सदस्य संख्या १०**

**विविध देश पातळीवरील कार्यकारी समिती**
**सदस्य संख्या ०५**

**महाराष्ट्र राज्याच्या ०६ विभागांसाठी**
**एकूण ०६ विभागीय समित्या**
**सदस्य संख्या प्रत्येकी १०**

## विश्वमंगल मराठी फाऊंडेशनची उद्दिष्टे

- मराठी संस्कृती, मराठी भाषा, शिक्षण, उद्योग, युवा आणि सामाजिक क्षेत्र यांसारख्या विषयावर विविध उपक्रम, परिषद, चर्चासत्रे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- जगभरातील मराठी उद्योजकांना मराठी मायभूमीमध्ये उद्योग उभारणीस प्रोत्साहित करण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दौऱ्यांचे नियोजन करणे.
- महाराष्ट्रातील नवउद्योजकांना जागतिक स्तरावरील विविध व्यासपीठे उपलब्ध करून देणे तसेच उद्योजकांमध्ये परस्पर देवाण-घेवाण घडवून आणून उद्योगवृद्धीसाठी सहकार्य करणे.
- महाराष्ट्रातील मराठी शाळांना नवी उभारी देण्यासाठी विविध मराठी उद्योजक /संस्थामार्फत शाळा दत्तक योजना राबविणे.
- जागतिक पातळीवरून महाराष्ट्रामध्ये उद्योगधंदे उभे करू इच्छिणाऱ्या उद्योजक व महाराष्ट्रातील स्टार्ट अप / नवउद्योजकांमध्ये समन्वयक व मार्गदर्शकाची भूमिका पार पाडणे.